दैनिक जनसंजीवनी
मंगळवार दि.१४/०५/२०२४
मुंबई, पुणे, नाशिक अहमदनगर
विश्वास तुमचा, साथ आमची

सुर्यदत्त एज्युकेशन फाऊंडेशनचे डॉ. संजय चोरडिया व सुषमा चोरडिया यांनी बजावला मतदानाचा हक्क

पुणे दि.१३ (प्रतिनिधी)– लोकसभा निवडणुकीचा चौथा टप्पा पार पडत असून पुणे जिल्ह्यातील लोकसभा मतदार संघाचा देखील यामध्ये समावेश आहे. सुर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व संस्थेच्या उपाध्यक्षा सुषमा चोरडिया यांच्यासह परिवारातील सर्व सदस्यांनी निवडणूक केंद्रात जावून मतदानाचा पवित्र हक्क बजावला आहे.

यावेळी सुर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी मतदारांना आवाहन करतांना ते म्हणाले की, आपल्याकडे लोकशाही पद्धत आहे. आपल्याला लोकशाहीने अनेक सुविधा, अधिकार, हक्क प्रदान केले आहेत. त्यापैकी मतदान हा सर्वांचा महत्त्वाचा हक्क व अधिकार आहे. त्यामुळे या अधिकाराचा वापर प्रत्येक भारतीय नागरिकाने प्राधान्याने करून मतदानाचे कर्तव्य पार पाडावे. सुदृढ व सक्षम लोकशाहीतून आपल्या देशाच्या विविधांगी विकासाला चालना मिळण्यास मदत होवून विकासाला गती मिळते. हा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून या देशाचा सुजाण नागरिक या नात्याने सर्वच मतदारांनी आपला मतदानाचा हक्क प्राधान्याने बजावणे अत्यंत गरजेचे आहे. सर्वांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावून एक सार्वभौम शक्तीशाली लोकशाही राष्ट्र उभारण्यास आपल्या मतदानाच्या स्वरूपात सहकार्य करावे असे आवाहन प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी यावेळी केले.

HANDEWADI
TRADE MARKET
A PROJECT BY SANTOSH GROUP

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

DIAGNOPEIN
Dental Check-up ₹50/-

१३ मे २०२४

महाराष्ट्र जैन वार्ताचे ICON मतदान करताना

पुणे : महाराष्ट्र जैन वार्ताचे ICON संजय चोरडिया व सुषमा चोरडिया यांनी मतदानाचा हक्क बजावला.



सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया आणि उपाध्यक्षा सुषमा चोरडिया यांनी मतदानाचा हक्क बजावला.

पुण्यनगरी

पुणे, शिरूर, मावळमध्ये लोकशाहीचा उत्सव दणक्यात

आज का आनंद
मंगलवार, 14 मई 2024
पुणे
पेज 9
पहली बार चुनाव प्रक्रिया में मतदान करनेवाले उत्साही युवा मतदाता